दिनेश
बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्टु सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २९२ । शुक्रवार २१ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## पत्रकार सुशील थोरात यांच्यावरील हल्ल्याचा पत्रकारांकडून तीव्र निषेध

### मकोकाअंतर्गत कारवाईची मागणी । अप्पर पोलीस अधीक्षकांना निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील साम टीव्हीचे ज्येष्ठ पत्रकार सुशील थोरात आणि त्यांचा मुलगा सार्थक यांच्यावर झालेल्या हल्ल्यामुळे पत्रकार वर्गात तीव्र संतापाची लाट पसरली आहे. हा हल्ला किरकोळ कारणावरून नसून पूर्वनियोजित कटाचा भाग असल्याचा आरोप करत, हल्लेखोरांवर 'मकोका'अंतर्गत कारवाई करण्याची कडक मागणी पत्रकारांनी अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्गे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पाईपलाईन रोडवरील एचडीएफसी बँकेसमोर गुरुवारी सायंकाळी वाहनाला धक्का लागल्याच्या कारणावरून एका टोळक्याने थोरात आणि त्यांच्या मुलाला मारहाण केली. मात्र, थोरात यांनी चालवलेल्या अवैध धंद्यांविरोधातील बातम्यांचा राग मनात धरूनच हा हल्ला घडवून आणल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. शहरातील वाढती गुंडगिरी, नशेखोरी आणि दहशत आता थेट पत्रकारांच्या सुरक्षेपर्यंत पोहोचली आहे. आज एका पत्रकारावर हल्ला झाला, उद्या दुसऱ्याचा नंबर का? असा सवाल उपस्थित करत हा प्रकार वृत्तपत्र स्वातंत्र्यावर घाला असल्याची भावना पत्रकारांनी व्यक्त केली.



**हल्लेखोर गुन्हेगारी पार्श्वभूमीचे**

हल्लेखोरांची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरूपाची असून त्यांच्यावर यापूर्वीही गुन्हे दाखल असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे पोलिसांनी केवळ अटक करून मोकळे न होता, या हल्ल्यामागील मुख्य सूत्रधारांचा शोध घ्यावा आणि पूर्वइतिहासाची सखोल चौकशी करून संघटित गुन्हेगारीचे कलम (मकोका) लावावे. भविष्यात पत्रकारांवर हल्ला करण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही, असा कठोर संदेश पोलिसांनी द्यावा, अशी ठाम मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## जिल्हा परिषद बांधकामातील कथित गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी

### राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन; सात दिवसांत कारवाई न झाल्यास बेमुदत उपोषणाचा इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत करण्यात आलेल्या विविध विकासकामांमध्ये कथित अनियमितता, निकृष्ट दर्जाचे काम तसेच अपूर्ण कामांची बिले काढण्यात आल्याचा आरोप करत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, तसेच दोषी आढळणाऱ्यांना शासन सेवेतून निलंबित अथवा बडतर्फ करावे, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबत पक्षाच्या सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष चंद्रशेखर पंचमुख यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन दिले. यावेळी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या नवीन प्रशासकीय इमारतीमधील स्वच्छतागृहाच्या दुरुस्तीचे काम बी–१ पद्धतीने मौजे दशमी गव्हाण ग्रामपंचायतीवर टाकण्यात आले. या कामासाठी नियमानुसार वृत्तपत्रात जाहिरात न देता प्रक्रिया करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच कामाची वर्कऑर्डर व देयकांमध्ये अनियमितता करून प्रत्यक्षात अपूर्ण असलेल्या कामांचेही बिल काढण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद सेस फंडातून करण्यात आलेल्या या कामात दुसऱ्या मजल्यावरील काम पूर्ण न करताच फर्स्ट अँड फायनल बिलापोटी ५ लाख ९५ हजार ३४७ रुपये अदा करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच विविध मजले व इतर कामांसह एकूण ३३ लाख ५४ हजार १२५ रुपयांचे बिल काढण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रत्यक्ष काम अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे असतानाही संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगनमताने शासकीय निधीचा गैरवापर केल्याचा आरोप पक्षाने केला आहे.

दरम्यान, जुन्या प्रशासकीय इमारतीतील वॉटरप्रूफिंगचे काम आरणगाव ग्रामपंचायतीमार्फत बी–१ पद्धतीने करण्यात आले. मात्र हे काम निकृष्ट दर्जाचे असून इमारतीमध्ये आजही पावसाचे पाणी गळत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित कामाचे बिल काढण्यात आले असून, काम पुन्हा करून देण्याबाबत लेखी

■ पान ४ वर

## पत्रकारावर हल्ला करणाऱ्या फरार आरोपींना पोलिसांनी तात्काळ अटक करावी – ॲड सुरेश लगड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** साम टी व्हीचे पत्रकार सुशील थोरात यांना अहिल्यानगर येथे १५ ते २०जणांच्या टोळक्याने बेदम मारहाण केली. पोलिसांनी मारहाण करणाऱ्या सर्वांनाच तात्काळ अटक करावी अशी मागणी जिल्ह्याचे जेष्ठ विधिज्ञ ॲड सुरेश लगड यांनी केली आहे. पत्रकारांवर हल्ला झाल्याने पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे . लोकशाहीचा चवथा स्तंभ असणाऱ्या पत्रकारांना सुरक्षितता राहीली नाही. त्यामुळे शहरात कायद्याचा धाक राहीला आहे कि नाही असा प्रश्न उभा राहिला आहे.



याबाबत नव्याने बदलून आलेल्या पोलीस अधिक्षक यांनी स्वतः या प्रकरणी लक्ष घालून आरोपींच्या मुसक्या आवळाव्यात, अशीही मागणी ॲड सुरेश लगड यांनी केली आहे.

## दरोड्याच्या तयारीतील पाचजणांची सराईत टोळी एलसीबीकडून जेरबंद

### दोन गावठी कट्टे व लक्झरी कारसह ३२ लाखांचा मुद्देमाल जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने शेंडी बायपास रोडजवळील लवणवाडी येथे दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या ५ सराईत गुन्हेगारांना रंगेहाथ अटक केली असून, त्यांच्याकडून दोन गावठी कट्टे, लक्झरी दोन कारसह एकूण ३२ लाख १९ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या सूचनेनुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखालील पथक एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत होते. दरम्यान, दोन विनाक्रमांकाच्या काळया रंगाच्या कारसह काही संशयित शेंडी बायपास रोडवर दरोड्याच्या तयारीत थांबल्याची बातमी खबऱ्याद्वारे मिळाली. पथकाने तातडीने छापा टाकून शाहरूख रज्जाक शेख (श्रीरामपूर), इम्रान अन्वर पठाण (कोपरगाव), तन्जीम नदिम शेख (येवला),, फिरोज चाँद शेख (येवला) व रेहान रौफ शेख (श्रीरामपूर) यांना ताब्यात घेतले. त्यांच्या कडून दोन गावठी कट्टे, दोन लक्झरी कार, ६ मोबाईल व मिरची पूड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

चौकशी दरम्यान आरोपी शाहरूख शेख व इम्रान पठाण हे सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले असून, त्यांच्यावर दरोडा, आर्म ॲक्ट आणि खुनाचा प्रयत्न यांसारखे गंभीर गुन्हे नोंद आहेत. त्यांनी हे कट्टे फरार आरोपी आसिफ उर्फ आश्यू पठाण व राजेंद्र गांगुर्डे यांच्याकडून खरेदी केल्याचे कबूल केले. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता आणि आर्म ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोणत्याही प्रकारचे कर्ज आता त्वरीत मिळवा!
गरजेला नक्कीच मदत आमची, उभे राहण्याची हिंमत तुमची !
राघव लोन सर्व्हिसेस
व्यावसायिक कर्ज 75 लाखांपर्यंत (विनातारण)
सर्व प्रकारच्या कर्ज सुविधा
जुन्या जेसीबी,ट्रॅक्टर, हायवा,कार, इ. साठीही कर्ज पुरवठा
▪ जलद मंजुरी ▪ कमी व्याजदर ▪ सुलभ हफ्ते





विनातारण कर्ज
▸ व्यवसायीक व पगारदारांसाठी खास सी.सी / ओ.डी सुविधा
▸ डॉक्टर लोन
▸ आकर्षक व्याजदर
तारण कर्ज
▸ घर,एन.ए प्लॉट,व्यवसायिक मालमत्ता यासाठी कर्ज सुविधा
▸ आर.झोन,गुंठेवारी,ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता यावरही त्वरीत कर्ज
वाहन कर्ज
▸ नविन व जुन्या कारसाठी कमीत कमी व्याजदरात त्वरीत कर्ज
▸ व्यावसायिक वाहनांसाठी शासकीय अनुदान
विनातारण व्यावसायिक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे : ▸ पॅन कार्ड ▸ आधार कार्ड ▸ शॉप ॲक्ट ▸ उद्यम आधार ▸ मागील तीन वर्षांचे आयटीआर ▸ बँक अकाऊंट स्टेटमेंट (पीडीएफ मध्ये) ▸ जीएसटी सर्टिफिकेट ▸ लाईट बिल ▸ फोटो
सर्व प्रकारच्या व्यवसायासाठी शासकीय कर्ज योजनांचे ऑनलाईन फॉर्म भरुन मिळतील तसेच कर्जासाठी योग्य मार्गदर्शन केले जाईल
अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ
मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम
ओ.बी.सी. महामंडळ योजना
(टीप - या योजनांसाठी सेवाशुल्क आकारले जाईल)
नियम व अटी लागू
700+ सिबिल स्कोअर 700+ असल्यास प्राधान्य
कोणतेही चालू कर्ज थकीत नसावे
आम्ही संपुर्ण महाराष्ट्रात कर्ज सेवा देतो
नामांकीत बँका व एनबीएफसी चे अर्थसहाय्य उपलब्ध !
अधिक माहितीसाठी संपर्क : 9960283285
पत्ता : शॉप नंबर 29,स्टेट बँके समोर,सुरजनगर,शिरुर,ता.शिरुर

# फिरोदिया शिवाजियन्स आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यांचा शनिवारी महासंग्राम

## आठही संघांची विजेतेपदासाठी जोरदार तयारी; शुक्रवारपासून तिसऱ्या क्रमांकासाठी रंगणार सामने



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेतील विविध गटांतील अंतिम तसेच तिसऱ्या क्रमांकासाठीचे सामने शुक्रवार (दि. २१ ऑगस्ट) आणि शनिवार (दि. २२ ऑगस्ट) रोजी अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर रंगणार आहेत. उपांत्यपूर्व व उपांत्य फेरीतील अटीतटीच्या सामन्यांनंतर आता स्पर्धेतील विजेतेपदासाठी अंतिम लढती होणार असल्याने फुटबॉलप्रेमींमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. शनिवारी अंतिम सामन्यांसाठी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. त्यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीसे प्रदान करण्यात येणार आहे.

या स्पर्धेत १२ वर्षांखालील मुले, १४ वर्षांखालील मुले, १६ वर्षांखालील मुले तसेच १६ वर्षांखालील मुली अशा चार गटांमध्ये सामने खेळविण्यात आले. विविध शाळांच्या संघांनी सुरुवातीपासूनच उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीत धडक मारली आहे. त्यामुळे प्रत्येक गटातील अंतिम सामना चुरशीचा आणि रंगतदार होण्याची शक्यता आहे.

शुक्रवारी (दि. २१ ऑगस्ट) विविध गटांतील तिसऱ्या क्रमांकासाठीचे सामने खेळविण्यात येणार आहेत. १६ वर्षांखालील मुलींच्या गटात श्रीसाई इंग्लिश मीडियम स्कूल आणि पोदार इंटरनॅशनल स्कूल यांच्यात सामना होणार आहे. दोन्ही संघांतील खेळाडू तिसरे स्थान मिळविण्यासाठी सर्वस्व पणाला लावतील.

१२ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूल आणि आयकॉन पब्लिक स्कूल यांच्यात तिसऱ्या क्रमांकासाठी लढत होणार आहे. तर १४ वर्षांखालील मुलांच्या गटात आठरे पाटील पब्लिक स्कूल आणि आर्मी पब्लिक स्कूल यांच्यात सामना होणार आहे. या सामन्यांमध्ये विजय मिळवून स्पर्धेत मानाचे स्थान मिळविण्यासाठी दोन्ही संघांकडून जोरदार खेळाची अपेक्षा आहे.

शनिवार (दि. २२ ऑगस्ट) हा स्पर्धेतील सर्वात महत्त्वाचा दिवस ठरणार असून, चारही गटांतील अंतिम सामने याच दिवशी खेळविण्यात येणार आहेत. १६ वर्षांखालील मुलींच्या गटात आर्मी पब्लिक स्कूल विरुद्ध प्रवरा पब्लिक स्कूल यांच्यात अंतिम सामना होणार आहे. मागील वर्षी प्रवरा पब्लिक स्कूलने या गटाचे विजेतेपद पटकाविले होते. यंदाही प्रवरा पब्लिक स्कूलने अंतिम फेरी गाठत आपले विजेतेपद कायम राखण्यासाठी सज्जता केली आहे. दुसरीकडे आर्मी पब्लिक स्कूलचा संघही संपूर्ण स्पर्धेत दमदार कामगिरी करत अंतिम फेरीत पोहोचला आहे. त्यामुळे मुलींच्या गटातील हा अंतिम सामना अत्यंत चुरशीचा ठरण्याची शक्यता आहे.

१२ वर्षांखालील मुलांच्या गटात आठरे पाटील स्कूल विरुद्ध सेंट मायकल स्कूल यांच्यात विजेतेपदासाठी सामना होणार आहे. मागील वर्षी आठरे पाटील स्कूलने विजेतेपद मिळविले होते. यंदा या संघासमोर सध्या उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या सेंट मायकल स्कूलचे आव्हान असणार आहे. त्यामुळे गतविजेत्यांना विजेतेपद राखण्यासाठी सेंट मायकलच्या आक्रमक खेळाला सामोरे जावे लागणार आहे.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूल विरुद्ध सेंट मायकल स्कूल असा अंतिम सामना रंगणार आहे. दोन्ही संघांनी दमदार कामगिरी करत अंतिम फेरी गाठली आहे. विशेष म्हणजे मागील वर्षी अंतिम सामन्यात स्थान मिळवू न शकलेले हे दोन्ही संघ यंदा अंतिम फेरीपर्यंत पोहोचले असून, यंदाच्या स्पर्धेत आपली छाप उमटविण्यासाठी दोन्ही संघ उत्सुक आहेत.

१६ वर्षांखालील मुलांच्या गटात सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूल विरुद्ध आर्मी पब्लिक स्कूल असा विजेतेपदाचा सामना होणार आहे. मागील वर्षी आर्मी पब्लिक स्कूलला अंतिम सामन्यात पराभव स्वीकारावा लागला होता. यंदा पुन्हा अंतिम फेरी गाठत आर्मी पब्लिक स्कूलने विजेतेपदासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. मागील वर्षीची हुरहूर भरून काढत यंदा विजेतेपद पटकाविण्याचा संघाचा प्रयत्न असणार आहे. दुसरीकडे सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूलचा संघही स्पर्धेत सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरी करत अंतिम फेरीत दाखल झाला आहे. दोन्ही संघ फॉर्ममध्ये असल्याने या सामन्यात मैदानावर वेगवान पासिंग, आक्रमक चाली आणि बचावफळीतील संघर्ष पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

या गटातील तिसऱ्या क्रमांकासाठी आठरे पाटील स्कूल आणि प्रवरा पब्लिक स्कूल यांच्यात सामना होणार आहे. आठरे पाटील स्कूल हा मागील वर्षीचा विजेता संघ असून, या संघाने सलग तिसऱ्यांदा विजेतेपद पटकाविले होते. त्यामुळे यंदा अंतिम फेरी हुकल्यानंतर तिसऱ्या क्रमांकाच्या सामन्यात विजय मिळवून स्पर्धेचा शेवट गोड करण्यासाठी आठरे पाटील स्कूल मैदानात उतरणार आहे. चारही गटांतील अंतिम सामन्यांमुळे स्पर्धेची उत्कंठा शिगेला पोहोचली असून, अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर युवा फुटबॉलपटूंच्या कौशल्याचा खेळ पाहायला मिळणार आहे.

# नशामुक्त भारतासाठी प्रत्येकाने सक्रीय योगदान द्यावे : डॉ. सुधा कांकरिया

## नशामुक्त भारत अभियानांतर्गत आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये सामूहिक प्रतिज्ञा

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** मादक पदार्थांचे सेवन करणे ही देशातील गंभीर समस्या बनली आहे. विशेषतः युवा पिढी व्यसनाधीन होत असल्याने शारीरिक, मानसिक व सामाजिक समस्या वाढत आहेत. त्यामुळे केंद्र सरकार आणि ब्रह्माकुमारीज संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नशा मुक्त भारत अभियान राबविले जात आहे. सरकारच्या या अभियानातंर्गत दादी प्रकाशमणीजी यांच्या पावन स्मृती निमित्त संचालिका राजराजेश्वरी दिदी यांच्या नेतृत्वाखाली नगरमध्ये आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये नशामुक्तीची सामूहिक प्रतिज्ञा करण्यात आली. सुमारे ५५० जणांनी एकाच वेळी नशामुक्तीची प्रतिज्ञा म्हणत या अभियानात सहभाग नोंदवला. अशी माहिती डॉ सुधा कांकरिया यांनी दिली.

यावेळी जैन सोशल फेडरेशनचे डॉ.प्रकाश कांकरिया, बीके डॉ. सुधा कांकरिया, बी के ज्ञानेश्वरी दिदी, प्रशासनाधिकारी डॉ. आशिष भंडारी, डॉ वंजारे, लोढा मॅडम आदींसह हॉस्पिटलमधील स्टाफ , रूग्ण, रूग्णांचे नातेवाईक उपस्थित होते.

डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या, व्यसनाधीनता रोखणं हे विकसित भारतासमोरील मोठे आव्हान बनले आहे. मादक पदार्थांचे सेवन अनेक गंभीर समस्या निर्माण करत आहे. सर्वच वयोगटातील व्यसनाधीनता चिंताजनक आहे. विशेषतः युवा पिढी लवकर व्यसनांच्या आहारी जात आहे. परिणामी आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. समृद्ध, सशक्त भारतासाठी व्यसनमुक्त समाजाची गरज आहे. सरकारने नशा मुक्त भारत अभियानातून व्यापक जनजागृती सुरू करून एक मोठे पाऊल उचलले आहे. यात देशातील प्रत्येक नागरिकाने सहभागी होऊन स्वतः नशा करणार नाही व इतरांचेही प्रबोधन करून व्यसनाधीनता हद्दपार करण्याचा संकल्प केला पाहिजे. ब्रह्मकुमारीज संस्थेद्वारे देशभरात या अभियाना अंतर्गत १० करोड व्यक्ती सहभागी होत आहेत. बीके ज्ञानेश्वरी दिदीने नशेचे दुष्परिणाम सांगत ते रोखण्यासाठी नशामुक्त अभियान हे महत्वाचे आहे याची माहिती दिली.

डॉ. आशिष भंडारी म्हणाले, विविध मादक पदार्थांच्या व्यसनांमुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. हॉस्पिटलमध्ये दाखल अनेक रूग्णांना व्यसनांमुळे व्याधी जडलेल्या असतात. अनेकांना शारीरिक व मानसिक समस्या उद्भवतात. हे कमी होण्यासाठी व्यसनमुक्ती आवश्यक आहे. यासाठी हॉस्पिटलमध्ये नेहमीच समुपदेशन केले जाते

# बीड जिल्ह्याच्या धर्तीवर नगरमध्ये अद्ययावत सहकार संकुल उभारा – पालकमंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचेकडे मागणी

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बीड जिल्ह्यात स्वतंत्र भव्य असे सहकार संकुल उभारले जात आहे. तशाच पद्धतीने सहकाराची पुण्यभूमी असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यात अद्ययावत असे सहकार संकुल उभारावे, अशी मागणी अभय ललवाणी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

श्री. ललवाणी यांनी निवेदनात पुढे म्हटले आहे की, अहिल्यानगर जिल्ह्याला सहकार चळवळीचा दैदीप्यमान असा इतिहास लाभलेला आहे. दूरदृष्टी असलेल्या अनेक दिग्गज नेत्यांनी जिल्ह्यात सहकार चळवळ निर्माण केली व वाढवली. त्यामुळेच जिल्ह्याला सहकाराची पंढरी म्हणून ओळखले जाते. भक्कम सहकार चळवळीमुळे राज्यातील व देशातील राजकारणामध्ये नगर जिल्ह्याचा नेहमीच दबदबा राहिलेला आहे.

अशा या सहकाराच्या पुण्यभूमीत सहकार विभागाचे कार्यालय म्हणजेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांचे कार्यालय सध्या भाडेतत्त्वावरील जागेत कार्यरत आहे. नगर तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था हे कार्यालय देखील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यापारी संकुलात कार्यरत आहे. दोन्ही कार्यालयांना अद्यावत सुविधा नाहीत. राज्याच्या सहकार विभागाने दिनांक ०४ जून २०२५ रोजी बीड जिल्ह्यात स्वतंत्र भव्य सहकार संकुल इमारत बांधकामासाठी रुपये १४९८.७९ लक्ष इतक्या किमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. बीड येथे भव्य सहकार संकुल उभारले जात आहे. मात्र सहकार चळवळीत राज्यात व देशात अव्वल असलेल्या नगर जिल्ह्याचे सहकाराचे मुख्यालय हे भाडेतत्त्वावरील जागेत असणे ही बाब मनाला खटकणारी आहे.

# मंगल भक्त सेवा मंडळाकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री दुर्गादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ढवळपुरी तालुका पारनेर जिल्हा अहिल्यानगर येथे मंगल भक्त सेवा मंडळ एमआयडीसी यांच्यामार्फत गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले यावेळी मंगल भक्त सेवा मंडळाचे सेवेकरी बंडू नाना सप्रे संतोष व्यवहारे अमोल मच्छा प्रीतम गांधी अमोल गीते उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य आदम शेख होते यावेळी पर्यवेक्षक सुधीर चव्हाण फकीर बाबा विद्यार्थी वस्तीगृहाच्या अधीक्षक सुधाकर सुळे उपस्थित होते श्रीदुर्गा देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील तसेच श्री फकीर बाबा विद्यार्थी वस्तीगृहातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी मंगल भक्त सेवा मंडळामार्फत शालेय दप्तर गणवेश व यांचे सुमारे १०० विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले यावेळी मंडळाचे सवेकरी बंडू नाना सप्रे यांनी ग्रामीण भागातील विशेषता वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना मंडळाकडून दरवर्षी शैक्षणिक साहित्याचे वाटप केले जात असल्याचे सांगून समाजाप्रती आपण काही देणे लागतो या भावनेतून मंडळ अनेक वर्षापासून गरजू होतकरू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याचे वाटप करत असते मंडळाकडून समाजातील गरजू कुटुंबासाठी ही मदत केली जाते. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य आदर्श यांनी मंगल भक्त सेवा मंडळाचा शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम गरज होतकरू विद्यार्थ्यांसाठी सेतू असून निश्चितच विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होत आह.

# संता शिवाय भगवंत प्राप्ती नाही हभप वैष्णवीताई मोरे

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**


(छाया– सतिष जगताप )

**खरवंडी कासार–** संता शिवाय भगवंताची प्राप्ती नाही असे प्रतिपादन ह भ प वैष्णवी ताई मोरे (शिवकथाकार कल्याण स्वामी संस्था चकलांबा ) यांनी केले कीर्तन सेवा ते बोलत होत्या आपण कस जगावं सेवा श्री संत भगवान बाबांनी जी शिकवण दिली त्या मार्गाने अनुकरण केल्यास आपले जीवन समृद्ध झाल्याशिवाय राहणार नाही शिक्षणा शिवाय पर्याय नाही आपली पुढील पिढी सक्षम करावी चांगले संस्कार द्यावेत तरच आपले पुढील आयुष्य समाधानात जाईल अन्यथा पश्चाताशिवाय काही मिळणार नाही आज जगात करोडपती संपत्ती वाले माणसं आहेत पण समाधान नाही पैशाचा उशाला पोत मात्र समाधान नाही संत संगतीशिवाय समाधान प्रगती नाही हेच अंतिम सत्य आहे यावेळी ह भ प वैष्णवी ताई मोरे यांचा सन्मान ऐश्वर्या गणेश अंदुरे ईश्वरी गणेश अंदुरे यांनी सन्मान केला सप्ताह संपन्नतेसाठी ग्रामस्थ युवा वर्ग प्रयत्नशील दिसून येत आहेत ज्ञानाचा सागर म्हणजे ज्ञानोबाराय ज्या काळात काहीच माहितीच साहित्य अवगत नव्हतं तेव्हाच ज्ञानेश्वरी ग्रंथात लिखाण करून जीवन जगण्याचा संदेश आहे संत ज्ञानेश्वर महाराज यांनी जीवन कसे जगावे याचा मार्ग दाखववला आहे आई–वडिलांची सेवा करा आयुष्यात काही कमी पडणार नाही असे मत हभप मोरे यांनी व्यक्त केले.

# देशभक्तीपर समूह नृत्य स्पर्धेत स्ट्रॉबेरी लिटिल स्टारच्या विद्यार्थ्यांनी पटकाविला द्वितीय क्रमांक

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समृद्धी वुमन्स मल्टीपर्पज सोसायटी संचलित भुतकरवाडी येथील स्ट्रॉबेरी लिटिल स्टार प्री–प्रायमरी शाळेच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर समूह नृत्य स्पर्धेत आपल्या कलागुणांची दमदार छाप उमटवत लहान गटात द्वितीय क्रमांक पटकाविला. माय भारत, जिल्हा क्रीडा कार्यालय आणि उडाण फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता.

या स्पर्धेत स्ट्रॉबेरी लिटिल स्टार प्री–प्रायमरी शाळेच्या विद्यार्थ्यांनी 'बुमरो' या गाण्यावर आकर्षक देशभक्तीपर नृत्य सादर केले. नृत्याच्या माध्यमातून 'मिशन सिंदूर'मधील विविध प्रसंग प्रभावीपणे साकारण्यात आले. चिमुकल्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, नृत्यातील समन्वय, देशभक्तीची भावना आणि सादरीकरणातील उत्साह यामुळे त्यांच्या नृत्याला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. विशेषतः देशाच्या शौर्याचे आणि सैनिकांच्या पराक्रमाचे दर्शन घडविणाऱ्या प्रसंगांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.



चिमुकल्या विद्यार्थ्यांनी वयाच्या मानाने अत्यंत आत्मविश्वासाने केलेले नृत्यसादरीकरण हे या स्पर्धेचे विशेष आकर्षण ठरले. गाण्याच्या तालावर अचूक पावले, आकर्षक हालचाली आणि 'मिशन सिंदूर'चा आशय प्रभावीपणे मांडत विद्यार्थ्यांनी देशप्रेमाची भावना जागविली. त्यांच्या या उल्लेखनीय सादरीकरणाची दखल घेत परीक्षकांनी लहान गटामध्ये स्ट्रॉबेरी लिटिल स्टार प्री–प्रायमरी शाळेला द्वितीय क्रमांक जाहीर केला.

या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती डोमकावळे, शालेय शिक्षिका धनश्री काळे (नृत्यदिग्दर्शिका), सविता सब्बन, सायली गायकवाड, शिल्पा भगत आणि समृद्धी डोमकावळे यांचा पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू शबनम शेख, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. प्रशांत साळुंके, मेहेरबाबा संस्थेचे विश्वस्त मेहेरनाथ कलचुरी, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, जय असोसिएशन ऑफ एनजीओचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष ॲड. महेश शिंदे, जयश्री शिंदे, उडाण फाउंडेशनच्या अध्यक्षा आरती शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत स्ट्रॉबेरी लिटिल स्टार प्री–प्रायमरी शाळेचे आदित्य गायकवाड, हर्ष वाघमोडे, आदित्य पारखे, शंकरषण चोपडे, निमिष साबळे, श्रद्धा गिते, नाविन्या काटे, रिद्धी भाळके, शिवन्या थोरवे, खुशी निकाळजे, आरुष पाडोळे, वरद सब्बन, ईशान सब्बन आणि अयंश गायकवाड या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. शाळेने मिळवलेल्या या यशाबद्दल पालकांमधून अभिनंदन होत आहे.

# उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे घवघवीत यश

## राज्य गुणवत्ता यादीत कल्याणी गदादे चौथी; ६१ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र शासनातर्फे इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलने उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यालयातील एकूण १०७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी गदादे कल्याणी भाऊसाहेब हिने राज्य गुणवत्ता यादीत चौथा क्रमांक, तर जिल्हा गुणवत्ता यादीत दुसरा क्रमांक मिळवत विद्यालयाच्या शैक्षणिक यशात मानाचा तुरा रोवला.

याचबरोबर जाधव सान्वी शरद, म्हस्के आशुतोष राजू, ठाणगे तेजल जयवंत, कासार ऋत्विक बाळासाहेब, क्षीरसागर अजिंक्य निलेश, जोशी श्रीअंश महेश, लाड श्रेयस भाऊसाहेब, निमसे दुर्वा दत्तात्रय, गुंड पुनम देविदास, भवर जीविका प्रशांत, वांद्रे अनन्या विनायक, कंठाळे आर्यन अजिनाथ आणि गायके आराध्या सागर या १४ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. तर विद्यालयातील एकूण ६१ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, सहकार्यवाह गौरव फिरोदिया आणि खजिनदार प्रकाश गांधी यांनी यशस्वी विद्यार्थी, पालक तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे विद्यालयाने केलेले नियोजनबद्ध मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. प्राचार्य कैलास साबळे, उपप्राचार्य निलेश भालेराव, पर्यवेक्षिका रेणुका परदेशी, नीलिमा शिंदे आणि पर्यवेक्षक बाळासाहेब पाटील यांच्या नियोजनानुसार अध्यापकांनी वर्षभर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांकडून नियमित सराव पेपर सोडवून घेण्यात आले. प्रतिभा भागवत, राधिका पंचारिया, राजेंद्र उगले, वैशाली मेहेर, यशश्री कुलकर्णी, सतीश गुगळे आणि दीपेश ओस्तवाल यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. निमंत्रक म्हणून अर्चना आळकुटे यांनी कामकाज पाहिले.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशामुळे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे.

(पान १ वरून)

# जिल्हा परिषद बांधकामातील कथित गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी

सूचना देऊनही त्याची दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. या प्रकरणात संबंधित कनिष्ठ अभियंता व त्यांच्या नातेवाईकांच्या भूमिकेचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी चौकशी समिती नियुक्त केली होती. मात्र संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध अहवाल साद करण्यास समितीने टाळाटाळ केली असून अद्याप अहवाल दाखल केलेला नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे चौकशी अधिकारी व समितीच्या भूमिकेचीही चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यापूर्वी संबंधित कनिष्ठ अभियंत्याकडील जिल्हा परिषद मुख्यालय, लाल टाकी व पंचायत समितीचा कार्यभार काढून घेण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र २३ जुलै २०२६ रोजी पुन्हा त्यांच्याकडे या कार्यालयांचा कार्यभार सोपविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना पुन्हा कार्यभार देण्यामागील कारणांची चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून संबंधित कनिष्ठ अभियंता वाय. बी. डेरे, उपअभियंता एस. एस. घोरपडे, तत्कालीन कार्यकारी अभियंता दक्षिण विभाग तसेच संबंधित चौकशी अधिकारी व समितीतील जबाबदार अधिकारी यांच्यावर कर्तव्यात कसूर, अधिकाराचा गैरवापर व शासकीय निधीच्या कथित गैरव्यवहाराबाबत कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, निवेदनावर सात दिवसांच्या आत ठोस कारवाई न झाल्यास जिल्हा परिषद कार्यालयाच्या आवारात बेमुदत उपोषण आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे.